पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.
मुख्य लेखा परिक्षक यांचे कार्यालय,
क्र.मुलेप/१/कावि/६०/२०१५
दिनांक :- ३०/०४/२०१५

विषय :- **मुख्य लेखा परिक्षण कार्यालयाकडे लेखा परिक्षणासाठी रेकॉर्ड उपलब्धतेबाबत...**

परिपत्रक,

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५, ४५३ सह अनुसुची प्रकरण ३ मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या विविध विभागांचे नियोजनबध्द व कालबध्द लेखापरिक्षण करण्यात येते. मुख्य लेखा परिक्षण कार्यालयामार्फत संबंधित विभागांचे लेखा परिक्षण सुरू करणे, लेखा परिक्षणासाठी रेकॉर्ड उपलब्ध करून देणे, लेखापरिक्षणासाठी माहिती नमुना नं.१ ते ५ मध्ये संगणक प्रणालीव्दारे व हार्ड कॉपीव्दारे सादर करणे, लेखापरिक्षणासाठी जबाबदार कर्मचा-याची नेमणुक करणे इ. बाबींसंदर्भात आगाऊ पत्र देण्यात येते.

तथापि असे निदर्शनास आले आहे की, यापूर्वी वेळोवेळी परिपत्रकाव्दारे कळवून त्याचप्रमाणे शाखाप्रमुखांचे सभेत सुचना देवुनही **लेखापरिक्षणासाठी रेकॉर्ड वेळेत उपलब्ध करून दिले जात नाही किंवा अल्प प्रमाणात रेकॉर्ड उपलब्ध करून दिले जाते.** त्यामुळे पर्यायाने त्या त्या वर्षात झालेला खर्च आक्षेपाधिन ठेवावा लागतो. तसेच लेखापरिक्षण कामकाजात अडथळा निर्माण होतो. **रेकॉर्ड उपलब्ध न झालेने आक्षेपाधिन रकमांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. सदरची बाब अतिशय गंभीर स्वरूपाची आहे.**

सबब सदर परिपत्रकाव्दारे सर्व विभागप्रमुखांना कळविण्यात येत आहे की, यापुढे मुख्य लेखा परिक्षण कार्यालयाचे नियोजनबध्द कार्यक्रमांनुसार संबंधित कालावधीतील संपुर्ण रेकॉर्ड लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करून द्यावे तसेच मुख्य लेखा परिक्षण विभागाचे पत्रानुसार विहीत मुदतीत नमुना क्र.१ ते ५ ची माहिती सादर करणेबाबत दक्षता घ्यावी. **विहीत मुदतीत सदर माहिती उपलब्ध न झालेस सदर विभागाचे संपुर्ण लेखा परिक्षण आक्षेपाधिन ठेवणेत येईल व त्याबाबत विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचा-यांना जबाबदार धरून पुढील प्रशासकीय कारवाई केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.**

**आयुक्त,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.

प्रति,
सर्व विभागप्रमुख,